# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी हाताने व मशीनव्दारे भांडी धुणेकामी लिक्वीड सोप खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, नामांकित उत्पादक कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.२५/ ०१ /२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०८/ ०२ /२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. १२,०००/- (अक्षरी रु. बारा हजार मात्र) बयाणा रक्कम व निविदा फी रु. २,४००/- (अक्षरी रु. दोन हजार चारशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

४. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. ०५/०२/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

६. कोणतीही निविदा अंशत: / पूर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से)

मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

14/01

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

# श्री साईप्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीडसोप पुरविणेबाबत ई-निविदा सन २०१९-२० करीता

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**निविदाधारकांसाठी सूचना**

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. १२,०००/- (अक्षरी रु. बारा हजार मात्र ) बयाणा रक्कम व निविदा फी रु. २,४००/ (अक्षरी रु. दोन हजार चारशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहिल.

४. सदर निविदा दि.२४/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.०६/०२/२०२५ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

७. **सदर ई-निविदेतील लिक्वीड सोपचे (Description) वर्णन हे BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.**

८. ई-निविदा भरतांना GST व इतर शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह दर नमूद करावेत.

९. सदर खरेदीची ई-निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी**

14/01

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे लिक्वीडसोपचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यानुसार निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. **सदर लिक्वीडसोपचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून एक वर्ष राहील. लिक्वीड सोप प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे मागणीनुसार ०४ टप्प्याने ५० लिटरच्या ड्रम/बॅरल सह खरेदी करण्यात येईल. त्याप्रमाणे पुरवठाधारकास लिक्वीड सोपचा पुरवठा करावा लागेल.**

३. निविदाधारकास निविदेसोबत निविदा फी रक्कम रु.२,४००/- (अक्षरी रुपये दोन हजार चारशे मात्र) व बयाणा रक्कम रु.१२,०००/- (अक्षरी रुपये बारा हजार मात्र) RTGS/NEFT द्वारे अगर ऑनलाईन वर्ग करुन अगर संस्थानच्या खात्यात भरता येईल.

४. दुकान नोंदणी दाखला/स्थनिक स्वराज्य संस्थेचा दाखला/उत्पादक संस्थेचा दाखला अगर तत्सम कागदपत्रे, GST नोंदणी सर्टिफिकेट/ऑनलाईन नंबरची पावती व पॅनकार्ड इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

५. शासन नियमानुसार वेळोवेळी लागु होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातुन कपात करण्यात येईल. शासनाने ०१ ऑक्टोबर २०१८ पासुन करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं. २०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्यानुसार संस्थानकडुन बीलातुन टॅक्स वसुल केला जातो. त्याचाही निविदाधारकांनी निविदा भरतांना विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६. लिक्वीडसोपचे प्रती लिटरचे दर सर्व कर, GST, हमाली, वाराई, वाहतूक खर्च वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पोहोचचे सर्व समावेशक दर द्यावेत. इतर कुठलाही खर्च स्वतंत्र आदा केला जाणार नाही. लिक्वीडसोप उतरविण्याची वाराई, हमाली पुरवठाधारकास द्यावी लागेल.

७. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत लिक्वीडसोप पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा संस्थानकडे करावा लागेल. सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थित माल पुरवठा केलेनंतर व करार कालावधी संपल्यानंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

८. निविदा मंजुर झालेनंतर त्वरित शिर्डी येथे समक्ष येऊन, रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

९. वरील ७ व ८ च्या अटीची पूर्तता केलेनंतर संस्थानकडून साहित्याचा पुरवठा आदेश दिला जाईल.

१०. ज्या लिक्वीडसोपच्या निविदा मंजुर होतील ते सर्व लिक्वीडसोप मान्य झालेल्या दर्जाचे पुरवावे लागेल. कमी दर्जाचे, वेगळ्या प्रकारचे लिक्वीडसोप स्विकारले जाणार नाहीत. अशा लिक्वीडसोपचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

...२...

**११. निविदाधारकाने पुरविलेले लिक्वीडसोप संस्थानने नाकारल्यास व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून लिक्वीडसोपची खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.**

१२. प्रसादालय व कॅन्टीन विभागास गरज भासल्यास लिक्वीड सोपची लॅब तपासणी सदर विभागाकडुन करण्यात येईल. लॅब तपासणीचा अहवाल पुरवठा आदेशाप्रमाणे नसल्यास उचित दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१३. प्रसादालय व कॅन्टीन विभागाने लिक्वीड सोप स्वीकारलेनंतर त्यांचे अभिप्रायानुसार साधारणत: ३० दिवसांत बील आदा करणेचा प्रयत्न राहील.

१४. लिक्वीडसोपच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१५. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**१६. निविदा कालावधीत अगर करारनामा कालावधीत मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा लिक्वीडसोपची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या लिक्वीडसोपचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेले सर्व लिक्वीडसोप घेणे, संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.**

१७. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्र. ३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्यूनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार द्वितीय न्यूनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील द्वितीय न्यूनतम दरधारक जर न्यूनतम दर धारकाच्या दरात लिक्वीडसोप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या लिक्वीडसोपच्या ५० टक्के लिक्वीडसोपचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर तयार नसतील तर पूर्ण लिक्वीडसोपचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

१८. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच लिक्वीडसोपचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच लिक्वीडसोपचे बिल सादर करावे.

१९. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कपाती बिलातून करण्यात येतील.

२०. पुरवठा आदेशातील वर्णनाचेच लिक्वीडसोपचा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील.

**२१. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

**२२. पुरवठा करीत असलेल्या लिक्वीड सोपची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन लिक्वीड सोप स्विकारले जाईल. तथापी लिक्वीड सोप स्विकारलेनंतरही एखादा लॉट खराब आढळल्यास सदर सोप स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.**

२३. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी (Technical Bid) उघडल्यानंतर १२० दिवसांचा राहील.

२४. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२५. लिक्वीडसोप पुरविणेचा आदेश पुरवठा आदेश दिलेनंतर मागणीप्रमाणे लिक्वीडसोपचा पुरवठा न झाल्यास, अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे लिक्वीडसोप नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके लिक्वीडसोप दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या लिक्वीडसोप साठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या लिक्वीडसोपच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२६. निविदेतील मंजुर दराने लिक्वीडसोप पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने लिक्वीडसोप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा लिक्वीडसोप पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन लिक्वीडसोप खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

२५. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

२७. पुरवठा आदेशातील लिक्वीडसोप मागणीप्रमाणे पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रति आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

आ) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रति आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

(श्रीमती. रुबल अग्रवाल भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

14/01

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------

ऑफीस ------------------------------------------------

दुकान ------------------------------------------------

निवास ------------------------------------------------

मोबाईल नंबर ------------------------------------------------

फॅक्स नंबर ------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ------------------------------------------------

२. ------------------------------------------------

६. बॅक खाते माहिती:- १. बॅक खाते नाव:- ------------------------------------------------

२. शाखा:- ------------------------------------------------

३. खाते नंबर व प्रकार:- ------------------------------------------------

४. बॅक IFSC कोड:- ------------------------------------------------

दिनांक - / /२०१९

ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) अगर तत्सम परवाना /उत्पादक परवाना

२. GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रंमाक पावती

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– श्री साईप्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता लिक्वीडसोप पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले लिक्वीड सोप आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे प्रसादालय / कॅन्टीन विभागात पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/DD/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. याकामी बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत लिक्वीड सोप वेळेवर शिर्डी येथील प्रसादालय / कॅन्टीन विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) -----------------------------------

(२) -----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

**Requirement of the Liquid soap (BOQ)**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Liquid Soap -**<br>Neutral Grade - (PH-7.5 TO 8.5)<br>1 Litre Liquid Soap in 10 Litre Water<br>(तिव्रता- १ लिटर सोपमध्ये १० लिटर पाणी)<br>For Dish Washing Machine and Manual Dish Wash | 23,700 | Litres | | |

(Smt. Rubal Agarwal I.A.S.)
**Chief Executive Officer**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

14/01

14/1/19